Vol II Issue XII Sept 2013

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Catalina Neculai
University of Coventry, UK

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Osmar Siena
Brazil

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Review Of Research
Vol. 2, Issue. 12, Sept. 2013
**ISSN:-2249-894X**
Available online at www.ror.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# ''संभ्रमित वर्तमान' मधील सामाजिक भान व 'उन्हाच्या कटाविरुद्ध' मधील आत्मभान देणाऱ्या कविता

*महादेव देशमुख*

सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख
संगमेश्वर कॉलेज सोलापूर.

***सारांश :***
प्रेमनाथ रामदासी हे नव्या पिढीतील लक्षणीय लेखन करणारे कवी आहेत. त्यांचा नुकताच 'संभ्रमित वर्तमान' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला आहे. शिरीश घाटे यांचे देखणे मुखपृष्ठ आणि कवी दत्ता हलसगीकर यांची मर्मग्राही प्रस्तावना ह्या या कवितासंग्रहाच्या जमेच्या बाजू आहेत.

***प्रस्तावना :***

रामदासी यांनी कवितासंग्रहामध्ये कवितेचे तीन भाग केले आहेतः ऋतुसंवाद, रेंगाळताना आणि संभ्रमित वर्तमानात. यावरुन त्यांची प्रगल्भता लक्षात येते. बऱ्याचदा काय होते विभिन्न जाणिवांच्या कविता सलगपणे वाचण्याऐवजी समान जाणिवांच्या कविता सलगपणे वाचल्यामुळे वाचकाला त्यांचा आस्वाद अधिक चांगल्याप्रकारे घेता येतो. रामदासींनी हा प्रयोग केल्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत यात शंकाच नाही. उलट त्यांचे जाहिरपणे कौतुकच.

कवितासंग्रहामधील तिन्ही भागामधील कवितांकडे स्वतंत्रपणे पाहावे लागते. कारण प्रत्येक प्रकारातील कविता अतिशय सरसपणे प्रकटलेल्या दिसतात. 'ऋतुसंवाद' या पहिल्या भागामध्ये निसर्गकविता आहेत. पण या निसर्गकविता पृथगात्म आहेत. फक्त निसर्गाच्या वर्णनात रमलेल्या या कविता नाहीत तर निसर्गातून जीवनाला पोशक असं काहीतरी शोधण्याची कवीची धडपड दिसते. म्हणूनच कवी दत्ता हलसगीकर प्रस्तावनेत लिहितात, "ऋतुसंवाद या पहिल्या भागात कवीला निसर्गातून काही जीवनतत्त्वं मिळतात. झाडावरची संळसळती पानं आयुर्मर्यादेचं भान देतात. विलोभनीय निसर्गसौंदर्यानं हा कवी केवळ रोमांचित होत नाही तर ऋतूंमधील गूढ समजून घेतो." हलसगीकरांचे हे निरीक्षण अचूक आहे. कवी निसर्गामधील गूढ तर समजून घेतोच पण त्याचबरोबर त्यातून आपण कोणता बोध घ्यायचा हेही नकळतपणें आपल्याला सांगून जातो. म्हणूनच उत्सव या पहिल्याच कवितेत तो जणू आपल्यालाच सांगतो,

"झाडे एकसुरात म्हणाली
त्यासाठी वसंतात शिशिर विसरुन
फुलता यायला हवं
आणि शिशिरात वसंत विसरुनं
निःसंग होता यायला हवं ।"
(उत्सव, पृ. 1)

ऋतुसंवाद मधील प्रत्येक कविता आपल्याला काही ना काही सांगत राहते. यशस्वी आणि आनंदी जीवनाची दिशा दाखवत राहते. 'निवडुंगाचं झाड' मध्ये गवताचं पातं निवडुंगाला सांगतं
शाप आणि वरदान

Title: ''संभ्रमित वर्तमान' मधील सामाजिक भान व 'उन्हाच्या कटाविरुद्ध' मधील आत्मभान देणाऱ्या कविता Source:Review of Research [2249-894X] महादेव देशमुख yr:2013 vol:2 iss:12

या जीवननाण्याच्या दोन बाजू आहेत
आणि तुला सांगतो
शापाबद्दल रडण्यापेक्षा
व्रदान दिलं म्हणून हसण्यातच
जीवनाचं सार्थक असतं
(निवडुंगाचं झाड, पृ. 4)

फुलांच मन मधील प्रेयसी ठणकावून सांगते,

ऋतुंचं स्वागत करायला
फुलाचं मन लागतं
(फुलांचं मन. पृ. 9)

तर पानगळ मधील झाड आपल्याला संदेश देते ऐवढेच नव्हे तर आपल्याशी आत्मसंवाद ही साधते यांची प्रचिती येते.

बहराशी नातं जोडायचं असेल
तर पानगळीची तयारी ठेवायलाच हवी
(बहर आणि पानगळ, पृ. 10)

अशा प्रकारचे जीवनवादी तत्वज्ञान रामदासींच्या प्रत्येक निसर्गकवितेमधून आपणांस पाझरताना दिसेल. नव्या पिढीत इतक्या तरल जाणिवेची आणि जीवनवादी निसर्गकविता लिहिणारा कवी सापडणे दुरापास्त आहे. रामदासींच्या रुपाने तो मराठी कवितेला गवसलेला आहे ही आशादायक बाब म्हणावी लागेल.

'तुझ्यात रेंगाळताना' या भागामध्ये अतिशय तरल भावनेच्या प्रेमकविता आढळतात. या प्रेमांमध्ये कुठेही आक्रस्ताळेपणा नाही की पश्चाताप नाही. अत्यंत विशुद्ध आणि उदार भावनेच्या या कविता असल्याचे दिसते. प्रेयसीची आतुरतेने वाट पाहणारा प्रियकर जसा यातून भेटतो तसा तिला वेळेचे महत्त्वही पटवणारा प्रियकर भेटतो. म्हणूनच एका कवितेमध्ये तो म्हणतो,

प्रियतम,
इतकापण उशीर करायला नको होतास।
(उशीर, पृ. 28)

प्रेयसीच्या अनिवार प्रेमाविशयी कृतज्ञता व्यक्त करताना कवी एका कवितेमध्ये म्हणतो

मी जेव्हा जेव्हा पाहतो
दिव्यावर प्राणार्पणाने झेपावणारा पतंग
तेव्हा तेव्हा
मला तुझी आठवण येते।
(समर्पण, पृ.26)

'सभ्रमित वर्तमानात' या भागातील कविता या कवितासंग्रहाचे बलस्थान आहेत. आसपासच्या विसंगत वास्तवावर कवीने अत्यंत आक्रमकपणे केलेले हे प्रहार आहेत. टी. व्ही. चॅनेल्सचे कुंटुंबावर होणारे परिणाम, मुलांवर होणारे वाईट संस्कार आणि हे सर्व दिसत असूनही काहीही करु न शकणारे पालक यांचे चित्रण काही कवितांमधून येते. वाढता जातीयवाद, व्यवस्थेमधील विसंगती यांचेही चित्रण काही कवितांमध्ये येते. कवी स्वतः प्राथमिक शिक्षक असल्याने शिक्षण क्षेत्रातील बजबजपुरीचाही कोथळा त्याने बाहेर काढलेला दिसतो. विद्यार्थ्यांच्या हितापेक्षाही स्वहीताला प्राधान्य देणारे गुरुजनवर्ग, फक्त कागदाला महत्त्व देणारे प्रशासन, प्रशासनात बोकाळलेला भ्रष्टाचार यांचे अत्यंत धाडसी आणि बेधडक चित्रण ही या कवितासंग्रहाची जमेची बाजू आहे. वाढत्या समस्या आणि त्यावर फक्त चौकशी समित्या नेमणारे वेळकाढू शासन यांच्यावर टीका करताना कवी एका कवितेमध्ये उद्वेगाने म्हणतो,

च्यायला हा देश आहे का चौकशींचा कारखाना.?
कधी संपणारंय हा

गरिबांच्या सहनशीलतेचा
अनंत रिळचा सिनेमा?
(चौकशी चालू आहे, पृ. 54)

सानेगुरुजींशी एक संवाद ही कविता तर मुळातून वाचण्यासारखी आहे. आजच्या वर्तमानातील पडझडीने अस्वस्थ होऊन कवीने सानेगुरुजींशी साधलेला संवाद खूप जिवंतपणे उतरलेला दिसतो. या भागातील प्रत्येक कविता अप्रतिम आहेत.

एकूणच प्रेमनाथ रामदासी यांचा 'संभ्रमित वर्तमान' हा कवितासंग्रह नव्या पिढीत खूप महत्त्वाचा ठरणारा आहे. रामदासींनी या कवितांमधून व्यक्त केलेले सामाजिक भान आजच्या कवितेला वेगळीचं उंची प्राप्त करुन देणारे आहे. रामदासींचा हा पहिलाच कवितासंग्रह असूनही त्यातील कवितांनी आधुनिक मराठी कवितेचा प्रवाह बळकट करण्याचे काम केलेले दिसून येते. म्हणूनच हा कवितासंग्रह अपेक्षा वाढवणारा ठरतो.

यानंतर आपण दुसरे लोकप्रिय कवी नागराज मंजुळे यांच्या 'उन्हाच्या कटाविरुद्ध' या कवितासंग्रहातील कविताचे स्वरुप पाहूया. हा कवितासंग्रह लक्षणीय आहे. या त्यांच्या पहिल्याच कवितासंग्रहाला भैरुरतन दमाणी साहित्य पुरस्कार मिळाल्यामुळे त्यांच्या कवितेची गुणवत्ता आणखीनच अधोरेखित झालेली आहे यात शंकाच नाही. नागराजच्या कवितांमधून एक आत्मभान जाणवते. त्यांच्या कवितांचे स्वरुप काहीसे आत्मनिष्ठ असले तरी वास्तवाशी नाते सांगण्याचा प्रयत्न त्याच्या कवितांमधून दृग्गोचर होतो. ते आपल्या पहिल्याच कवितेत म्हणतात,

माझ्या हाती
नसती लेखणी
तर...
तर असती छिन्नी
सतार...बासरी
अथवा कुंचला
मी कशानेही
उपसत राहिलो असतो
हा अतोनात कोलाहल मनातला
(माझ्या हाती नसती लेखणी, पृ. 4)

या ओळींमधून नागराजची अभिव्यक्तीसाठीची ओढ व्यक्त होते. आपण कवी नसलो असतो तरी कोणत्या न कोणत्या रुपात व्यक्त होतच राहिलो असतो हे त्याचे विधान त्याच्यामधील कलावृत्ती दिसून येते.

नागराजच्या काही कवितांमधून विफल प्रेमाचे दर्शनही घडताना दिसते. प्रेमात जात, धर्म अथवा परिस्थिती येऊ नये पण ते नागराजच्या कविते मध्ये दिसते.

तू तुझी स्वप्नबीजं घेऊन जा
एक नवी सुपीक जमीन शोध
माझ्या या वांझोट्या भूमीला
कधी तरी दिवस जातीलच
इथेही फले फुलतील
स्वप्नं साकारतील
पण तोवर
मला माझ्या स्वप्नाचं खत–पाणी करुन
मला स्वतःलाच गाडून घ्यायला हवं
माझ्या या चुरगळलेल्या माणसांसाठी
(तुझ्या येण्याअगोरदर, एक पत्र, पृ.12)

या कवितेमधून अगतिकता जशी व्यक्त होते तसा त्याचा स्वाभिमानही व्यक्त होतो. आपण ज्या

वर्गात जन्माला आलो त्या वर्गाच्या उन्नतीसाठी झटण्याचा त्याचा मनोदयही प्रत्ययास येतो.

शोषितांविषयी वाटणारी कणवही नागराजच्या कवितांमधून प्रकट होते. एका कवितेमध्ये तो देहविक्रय करणाऱ्या स्त्रियांविषयी सहानुभूती व्यक्त करताना म्हणतो,

मुलीच्या शाळेचा खर्च, आईची औषधं
दलालाचे इतके अन खाटेचं भाड वेगळंच
तुम्ही करुन पाहिला आहे का कधी
वेश्येचा संभोगरत हिशोब
(काही प्रश्न, पृ. 63)

एकूणच नागराज मंजुळेंची कविता आश्वासक आहे. तिला स्वतःचा असा चेहरा आहे. स्वतःची अशीं शैली आहे. भविष्यात त्यांच्याकडून अधिक सकस कवितेची अपेक्षा आहे.

एकूणच दोघाच्या कवितामधून सामाजिक भान आणि आत्मभान येणारा विषय आपणांस स्पष्टपणे दिसून येतो.

***संदर्भ ग्रंथ :***


- मराठी कविता स्वरूप विवेचन – निशिकांत ठकार.
- कविता आणि प्रतिमा – सुधीर रसाळ.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net